**MVP Samaj's,**

Arts, Science and Commerce College, Ozar (Mig)

# Report

## Constitution Day Celebration

The college celebrates Constitutional Day on 26$^{th}$ November every year in the college. The aim of this occasion is to make the students know the Indian constitution and make them aware about the importance of it. The college celebrates this function under the chairmanship of the Principal. The college organizes collective reading of Preamble of the constitution. All the staff and students actively participate in this program.

PRINCIPAL
Arts Science and Commerce College
Ozar (Mig), Dist. ashik-422 206.






**Preamble Displayed in the College**




**Constitution Day Celebration 26th November 2015**
**Chair Person – Principal Dr A. P. Patil**





**Constitution Day Celebration 26th November 2016**
**Chair Person – Principal Dr A. P. Patil**




**Constitution Day Celebration 26th November 2017**
**Chair Person – Principal Dr S. V. Patil**





**Constitution Day Celebration 26th November 2018**
**Chair Person – Principal Dr. S. V. Patil**

# संविधान दिन

■ ओझर। दि.२९ वार्ताहर

दै० देशदूत

दि.

संविधान म्हणजे राज्यघटना. भारतीय संविधान हे लिखित किंवा पुस्तक स्वरुपात आहे. त्यांच्या मुखपृष्ठावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे डॉ. राजेंद्र प्रसाद यांना राज्यघटना देतात असा फोटो आहे. अनेकांना अभ्यास करावासा वाटेल अशी ही राज्यघटना आहे. शालेय स्तरावर नागरीकशास्त्र, लॉ आणि स्पर्धा परिक्षांमध्ये राज्यघटनेचा अभ्यास केला जातो. कोणताही कायदा करावयाचा असेल तर राज्यघटनेला धरुनच केला जातो अशी माहिती प्राचार्य डॉ.ए.पी. पाटील यांनी सांगितली.

मविप्रच्या ओझर (मिग) महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.पी. पाटील यांनी भारतीय संविधान दिनानिमित्त भारतीय संविधानाचे महत्त्व विशद करतांना ते पुढे म्हणाले की, भारतीय संविधानाची उद्देशिका वैशिष्ट्यपुर्ण आहे. प्रत्येकाला शुद्ध हवा घेण्याचा अधिकार संविधानाने दिलेला आहे. म्हणुनच धुम्रपान विरोधी कायदा करण्यात आला आहे. कैद्यांना सुद्धा संविधानाने अधिकार दिलेले आहे. गुन्हेगाराला आपली बाजु मांडण्याचा अधिकार आहे. विचार, अभिव्यक्ती व धार्मिक स्वातंत्र्य, जन्मापासुन मृत्यूपर्यंतचे सर्व अधिकार, गरीबासाठी स्वस्त दरात अन्न, वैद्यकीय सेवा, शिक्षणाचा अधिकार देण्यात आलेला आहे. आरक्षणाचे नियम ठरवुन दिलेले आहेत. आपण भारतीय नशिबवान आहोत, आपल्याला संविधान मिळालेले आहे. त्यानुसार आपण आयुष्य जगतो आहोत. या कार्यक्रमात प्रा.व्ही.एस. सोनवणे यांनीही विद्यार्थ्यांना संविधानाची माहिती सांगितली. ९ डिसेंबर १९४६ रोजी संविधान लेखनाला प्रारंभ झाला व २६ नोव्हेंबर १९४९ रोजी लेखन पुर्ण झाले म्हणुन २६ डिसेंबर हा संविधान दिन म्हणुन साजरा केला जातो. भारतीय संविधानाची सर्वात मोठ्या लोकशाही देशाची विस्तृत राज्यघटना, ६५ वर्षे झाली तरी ती कालबाह्य झालेली नाही. कायद्याची नियमावली त्यात दिलेली आहे. न्याय-स्वातंत्र्य-समता-बंधुतेची शिकवण देणारी, जगात यासारखे दुसरे संविधान नाही, ही वैशिष्ट्ये आहेत. दि. २६ जानेवारी १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी सुरु झाली. म्हणुन २६ जानेवारी हा प्रजासत्ताक दिन साजरा केला जातो. कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचलन प्रा. गोडगे यांनी केले तर प्रा. ढेंगे यांनी आभार मानले. उपप्राचार्य आर.एच. ठाकरे, उपप्राचार्या एस.टी. वाघ, स्टाफ सेक्रेटरी प्रा.व्ही.एन. शेळके, प्रा. पानगव्हाणे, प्रा. भदाणे, प्रा.एस.पी. जाधव, डॉ.एस.आय. पटेल, प्रा.एम.के. देवरे, प्रा. चव्हाण मॅडम, डॉ. मंजूर सैय्यद, प्रा. श्रद्धा रासवीकर, प्रा. सुरेखा ब्राम्हणकर, प्रा. सौदागर, प्रा. ढेपले आदींसह मान्यवर प्राध्यापक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.